# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः16.03.2024** **वारःशनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीचं वेळापत्रक आज जाहीर होणार
2. चालू वित्त वर्षात एक लाखांहून अधिक स्वामित्व हक्क जारी केल्याची पियुष गोयल यांची माहिती
3. ई वाहन निर्मिती, गुंतवणूक वाढीसाठी नवं ई वाहन धोरण अमलात येणार
4. जम्मू आणि काश्मिर आरक्षण सुधारणा कायद्याला प्रशासकीय परिषदेची मंजुरी आणि
5. महिला प्रिमियर लीग क्रिकेट मध्ये आरसीबीची अंतिम फेरीत धडक

**लोकसभा निवडणूक**

आगामी लोकसभा निवडणूकीचं वेळापत्रक केंद्रिय निवडणूक आयोग आज जाहीर करणार आहे. त्यानंतर लगेचच निवडणूक आचारसंहिता लागू होईल. नवी दिल्लीत होणाऱ्या पत्रकार परिषदेत काही राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकीचं वेळापत्रक देखील जाहीर केलं जाणार आहे. यावेळीही लोकसभा निवडणुकीसाठीचं मतदान एप्रिल आणि मे महिन्यात वेगवेगळ्या टप्प्यात होण्याची शक्यता आहे. दरम्यान, ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांनी काल निवडणुक आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी त्यांचं कार्यालयात स्वागत केलं.

**निवडणूक रोखे**

स्टेट बँकेनं निवडणूक रोख्यांबाबत दिलेली माहिती अपुरी असल्याचं सांगत, याबाबत रोख्यांच्या क्रमांकांची माहिती सोमवारपर्यंत द्यावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल स्टेट बँकेला दिले. या संदर्भात न्यायालयात दाखल केलेल्या कागदपत्रांची प्रत मागणारा अर्ज आयोगानं सर्वोच्च न्यायालयात दाखल केला होता. त्यावेळी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या खंडपीठानं हे आदेश दिले. निवडणूक रोख्यांच्या निधीबाबत माहिती जाहीर करण्यात आली. पण त्यामध्ये कोणत्या खरेदीदारानं कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, हे मात्र स्पष्ट नाही.

**शहा निवडणूक रोखे**

भारतीय राजकारणामध्ये काळ्या पैश्याचा वापर कमी करण्यासाठी निवडणूक रोखे पद्धत सुरु करण्यात आली. आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा आदर करतो परंतु ही पद्धत पूर्णपणे बंद करण्याऐवजी त्यामध्ये काही सुधारणा केली जाऊ शकते, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी

काल नवी दिल्ली इथं माध्यम समूहानि आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात बोलताना केलं. 20 हजार कोटी रुपयांच्या निवडणूक रोख्यांपैकी भारतीय जनता पक्षाला जवळपास 6 हजार कोटी रुपये मिळाले. तर मग बाकीचे 14 हजार कोटी रुपयांचे रोखे कुठे गेले असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला. या देशात सतत होणाऱ्या निवडणुकांमध्ये देशातील नागरिक व्यस्त राहतात. सतत होणाऱ्या निवडणुकांमुळे पैसाही बर्याच प्रमाणात खर्च होतो. आचारसंहितेमुळे सुरु असलेली विकास कामं थांबतात. हे सर्व थांबण्यासाठी एक राष्ट्र एक निवडणूक हा पर्याय योग्य असल्याचंही शहा म्हणाले.

**<u>गोयल पेटंट</u>**

चालू वित्त वर्षामध्ये देशात जवळपास 1 लाखांपेक्षा अधिक स्वामित्व हक्क जारी केले गेले असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईमध्ये भारत रत्नम या सामान्य सुविधा केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या केंद्रामार्फत प्रतिवर्षी 1600 युवांना रत्न आणि दागिन्यांविषयी प्रशिक्षित केलं जाणार आहे. 2014 पूर्वी भारतात दरवर्षी जवळपास 6500 स्वामित्व हक्क जारी केले जात होते.स्वामित्व हक्कांसाठी अर्ज करणार्यांमध्ये 52 टक्के प्रमाण भारतीयांच असल्याचही त्यांनी यावेळी बोलताना सांगितल.

**<u>पीएम नागरकुर्नूल</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तेलंगणमधील नागरकुर्नूल इथं विजय संकल्प सभेत नागरिकांना संबोधित करतील. पंतप्रधान दोन दिवसांच्या तेलंगण दौर्यावर आहेत. भाजप निवडणुकीच्या तयारीमध्ये आघाडीवर असून तेलंगण 17 पैकी 15 जागांसाठी उमेदवारांची नावं त्यांनी आधीच जाहीर केली असल्याचं आमच्या वार्ताहारानी कळवलं आहे.

**<u>ई वाहन धोरण</u>**

देशातील ई वाहन निर्मिती मध्ये वाढ करण्यासाठी केंद्र सरकार नवं ई वाहन धोरण अमलात आणत आहे. ई वाहन क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणं हा या मागचा उद्देश असून या धोरणामुळं मेक इन इंडिया अंतर्गत देशातील ग्राहकांपर्यंत नवीनतम तंत्रज्ञान पोहोचवणं हा आहे. ई वाहन क्षेत्रात सशक्त स्पर्धेला प्रोत्साहन देऊन ई वाहनांच्या उत्पादन वाढी बरोबरच देशातील अर्थव्यवस्थेला चालना देणं, हा हि या धोरणामागचा उद्देश आहे. कंपन्यांना गुंतवणुकीसाठी कमीत कमी 4150 कोटी रुपयांपर्यंत मर्यादा ठेवण्यात आली असून अधिक गुंतवणुकीसाठी कोणतीही मर्यादा नाही. फक्त व्यावसायिक उत्पादन सुरु करण्यासाठी गुंतवणुकीनंतर व्यावसायिकाकडे 3 वर्षांचा कालावधी असेल.

**<u>संरक्षण डॉर्नियर विमान</u>**

संरक्षण मंत्रालयान काल नवी दिल्लीमध्ये भारतीय नौसेनेच्या 25 डॉर्नियर विमानांच्या उन्नतीकरणासाठी हिंदुस्तान एअरोनॉटीक लिमिटेड या कंपनीसोबत 2 हजार 890 कोटी रुपयांच्या करारावर स्वाक्षरी केली. यामुळं समुद्री आणि किनारी भागात पाळत ठेवणं. इलेक्ट्रॉनिक बुद्धिमत्ता आणि

समुद्री कार्यक्षेत्रात जागरूकता यांच्या विकासात वृद्धी होणार असल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. या उन्नतीकरणामुळं रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून संरक्षण क्षेत्रातील अत्मानिर्भरतेला वाव मिळणार आहे.

**राष्ट्रपती**

अध्यात्मावर आधारित आपल्या भारतीय संस्कृतीनं जागतिक बंधुत्वाची भावना केंद्र स्थानी ठेवली असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. हैदराबाद इथल्या कान्हा शांती वनम् मध्ये आयोजित चार दिवसीय जागतिक अध्यात्म महोत्सवाला संबोधित करताना त्या बोलत होत्या. भारतानं कोणत्याही एकाच तत्वज्ञानाला बरोबर आणि इतर चूक असं न म्हणता, सत्यापर्यंत पोहोचण्याच्या सर्व मार्गांचा आणि सर्वत्र समदर्शनाचा आदर केला आहे. समता ही आपल्या अध्यात्मिक परंपरेचा आधार आहे. नीतिमत्ता आणि अध्यात्मावर आधारित जीवन वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही स्तरांवर लाभदायक असल्याचंही मुर्मू म्हणाल्या. आपल्या परंपरेत अध्यात्म आणि आचार हे दैनंदिन जीवन आधार मानले गेले असल्याचं प्रतिपादन मूर्मू यांनी यावेळी बोलताना केलं.

**सीएए**

नागरिकत्व सुधारणा कायदा 2019 अंतर्गत अर्ज करण्यासाठी केंद्र सरकारकडून सीएए-2019 हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आलं आहे. गृह मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, अर्जदार गुगल प्ले स्टोअर वरून ॲप डाऊनलोड करू शकतात. तसंच indiancitizenshiponline.nic.in या संकेतस्थळावरूनही हे अँप डाऊनलोड करता येणार आहे.

**जम्मू काश्मिर आरक्षण**

जम्मू आणि काश्मिर मध्ये उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अध्यक्षतेखालच्या प्रशासकीय परिषदेनं जम्मू आणि काश्मिर आरक्षण सुधारणा कायद्याला मान्यता दिली आहे. 2005 सालच्या सुधारणा करण्याच्या सामाजिक कल्याण विभागानं हा प्रस्ताव मांडला होता. संविधान (जम्मू आणि काश्मिर) अनुसूचित जाती आदेश (सुधारणा) कायदा, 2024, संविधान (जम्मू आणि काश्मिर) अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा, 2024 आणि जम्मू आणि काश्मिर सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आयोगाच्या शिफारशी सरकारी आदेश क्रमांक 2030 द्वारे स्थापन करण्यात आले आहेत.

आकाशवाणी वार्ताहराने दिलेल्या माहितीनुसार, चार नवीन जमाती म्हणजे पहाड़ी, पड्डारी, कोली आणि गड्डा ब्राह्मण यांना प्रशासकीय परिषदेनं 10 टक्के आरक्षण मंजूर केले.

**सिनेमॅटोग्राफी नियम**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं, चित्रपटांना दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्र प्रक्रियेत सर्वसमावेशक सुधारणा सुचवणारे नियम अधिसूचित केले आहेत. चित्रीकरण प्रक्रियेत सुधारणा घडवण्यासाठी आणि सार्वजनिक प्रदर्शनाच्या दृष्टीनं प्रमाणीकरणाची संपूर्ण प्रक्रिया समकालीन व्हावी

यासाठी हे नियम करण्यात आल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. जागतिक पातळीवर नावाजलेल्या भारतीय चित्रपट उद्योगात दरवर्षी 40 हून अधिक भाषांमध्ये तीन हजारांहून अधिक चित्रपटांची निर्मिती केली जाते. डिजीटल काळात चित्रपट प्रमाणीकरण प्रक्रिया सुव्यवस्थित आणि अधुनिक करणं, उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि चित्रपट क्षेत्रातली प्रगती यांच्याशी सुसंगत राहणं हे या नव्या नियमांचं उद्दीष्ट आहे. प्रमाणीकरण प्रक्रिया आणि व्यवहारांसाठी लागणाऱ्या वेळेत कपात करण्यासाठी संपूर्ण डिजीटल प्रक्रियांचा अवलंब करणे याचा मार्गदर्शक तत्वांमध्ये समावेश करण्यात आला आहे. यात दिव्यांग व्यक्तींसह सर्वांसाठी सर्वसमावेशक सुलभ सुविधा उपलब्ध होणार आहेत.

**<u>बॅँडमिंटन</u>**

भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन नं ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरूष एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. लक्ष्य सेन जागतिक क्रमवारीत 18 व्या स्थानी आहे. त्यानं जागतिक क्रमवारीत 10 व्या क्रमांकावर असलेल्या मलेशियाच्या ली झी जिया याचा 20-22, 21-19, 21-19 असा पराभव केला. 71 मिनिटे सुरू असलेल्या कालच्या सामन्यात लक्ष्य ने पहिला गेम 20-22 ने गमावल्यानंतर पुढच्या दोन्ही सेट मध्ये मात्र मुसंडी मारली. आज लक्ष्य ची लढत इंडोनेशियाच्या जोनातन ख्रिस्ती शी होईल दुपारी साडेतीन वाजता हा सामना होणार आहे.

**<u>महिला प्रिमियर</u>**

महिला प्रिमिय लीग क्रिकेटमध्ये रॉयल चॅलेजर्स बंगळुरू संघानं काल गतविजेत्या मुंबई इंडियन्सचा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. बंगळुरु संघानं मुंबई इंडियन्सचा पाच धावांनी पराभव केला. उद्या अंतिम फेरीत रॉयल चॅलेजर्स बंगळुरू चा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे. प्रथम फलंदाजी करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं निर्धारित 20 षटकांत 6 गडी गमावून 135 धावा केल्या. मुंबई इंडियन्सला 20 षटकांत 6 विकेट्सवर केवळ 130 धावा करता आल्या.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.